# जाहिरात

## ठाणे महागगरपालिका, ठाणे

## लेखापरिक्षा विभाग

**करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षकांच्या सेवा उपलब्धततेसाठी जाहिरात**

लेखापरिक्षा विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे मार्फत माहे ऑक्टोबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीसाठी महापालिका मुख्य लेखापरिक्षक, महालेखाकार व स्थानिक निधी लेख विभागाने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षकांच्या सेवा उपलब्ध करणेसाठी इच्छूक व पात्र सेवानिवृत्त लेखापरीक्षकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहीत नमुन्यातील अर्ज मुख्य लेखापरिक्षक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, प्रशासकीय भवन, दुसरा मजला, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे यांच्याकडे तसेच ठाणे महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छूकांनी ते परिपूर्ण रित्या भरून दि. १६/०९/२०१७ पर्यंत लेखापरिक्षा विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे या कार्यालयाकडे पाठवावेत. अर्जाच्या लिफाफ्यावर **करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षक या पदासाठी अर्ज** असे ठळक अक्षरांत नमूद करावे. अर्जासोबत स्वत:चा पत्ता असलेला व त्यावर रु. ५/- चे पोस्ट मुद्रांक चिकटविलेला १५ सें.मी. X १० सें.मी. आकाराचा लिफाफा पाठविण्यात यावा. निवडलेल्या लेखापरीक्षकांना त्यांच्या सेवा लेखापरीक्षणासाठी घेण्यात येत असल्याबाबतची पत्रे पोस्टाने /ई-मेल द्वारे पाठवण्यात येतील.

१) **पदाचे नाव :** करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षक

२) **विभागासाठी आवश्यक लेखापरीक्षकांची संख्या :-** १४

३) **पात्रतेचे निकष :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब (राजपत्रित / अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.

**किंवा**

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागातून वरिष्ठ लेखापरीक्षक / कनिष्ठ लेखापरीक्षक या पदावरुन सेवानिवृत्त झालेले कर्मचारी.

**किंवा**

ठाणे महानगरपालिकेच्या लेखा व लेखापरिक्षा विभागातून लिपीक /लेखापरिक्षक अथवा त्यावरील पदावरुन सेवानिवृत्त झालेले कर्मचारी.

४) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्याचे वय ६५ वर्षाहून अधिक नसावे.

५) स्वेच्छा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांबाबत सेवानिवृत्त झाल्याचा कालावधी ७ वर्षापेक्षा अधिक नसावा.

६) अधिकारी / कर्मचारी शारीरीक दृष्ट्या सक्षम असावा.

७) त्याला शासकीय नियमांची तसेच लेखापरीक्षण विषयक अधिनियम व नियमांची माहिती असावी

८) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द त्यांच्या शासकीय सेवा कालावधीतील कामकाजाबाबत कोणत्याही प्रकारचे विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.

९) करारपद्धतीने निवड करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांनी विहीत नमुन्यातील वचनपत्र भरुन देणे आवश्यक आहे.

**४) मानधन :-**

करार पध्दतीने मानधन तत्वावरील लेखापरीक्षकांना शासन निर्णय क्र. संकिर्ण - २७१५/प्र.क्र. १००/१३ दि.०८/०१/२०१६ नुसार मानधन देण्यात येईल.

मुख्य लेखापरिक्षक

ठाणे महानगरपालिका, ठाणे

# (आवेदन पत्र)

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

### करार पध्दतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षक यांच्या सेवा उपलब्धततेसाठी अर्ज

१) लेखापरीक्षकाचे संपूर्ण नाव व पत्ता :

२) दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक :

३) ई- मेल

४) अ) जन्मतारीख व दि. ३०/०९/२०१७ रोजी अर्जदाराचे वय :

ब) शासन सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा दिनांक :

क) वयाची ६५ वर्षे पूर्ण होण्याचा दिनांक :

५) शैक्षणिक पात्रता :

६) ज्या पदावरुन सेवानिवृत्त झाले त्याचे पदनाम व कार्यालयाचे नाव :

७) लेखापरीक्षणाच्या अनुभवाचा तपशील. :

ठिकाण :-

दिनांक :-

लेखापरीक्षकाची स्वाक्षरी
संपूर्ण नाव

**टिप :-**

विहीत नमुन्यात भरलेला अर्ज, अर्जातील अ.क्र. ४ ते ६ बाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या सत्य प्रती आणि १५ सें.मी. X १० सें.मी. आकाराचा स्वत:चे नाव, पत्ता असलेला व **रु.५/- चे पोस्ट मुद्रांक** चिकटविलेला लिफाफा एका मोठ्या लिफाफ्यातून मुख्य लेखापरिक्षक, ठाणे महानगरपालिका, दुसरा मजला, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे (प) या पत्त्यावर दिनांक १६/०९/२०१७ पर्यंत पाठविण्यात यावा.